शासन सेवेत पुन:स्थापनेनंतर पदस्थापना देण्याबाबत.
श्री.शंभूराजे बबनराव वाबळे, उप अधीक्षक भूमि अभिलेख.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश, क्रमांक:- आस्था-०७२६/प्र.क्र.२९२/आस्था-६ (E-१७६७३४४)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे आदेश, क्र.आस्था/ एस.आर.६८८६/आ-२/२०२५, दि.२४.०३.२०२५
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.निप्रआ-१११२/प्र.क्र.०९/विचौ-२, दि.२२.०४.२०२५
३. महसूल व वन विभाग, शासन आदेश, क्र.तक्रार-०७२५/प्र.क्र.२५७/आस्था-५, दि.०१.०७.२०२६

शासन आदेश:-

श्री.शंभूराजे बबनराव वाबळे, तत्का.कार्यालय अधीक्षक, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल झाल्याच्या अनुषंगाने वाचा क्र.१ येथील जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांच्या आदेशान्वये श्री.वाबळे यांना दि.१५.०३.२०२५ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.२२.०४.२०२५ मधील तरतुदींच्या अनुषंगाने श्री.वाबळे यांच्याविरुद्धच्या प्रस्तावित असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणातील निर्णयाच्या अधीन राहून त्यांना वाचा क्र.३ येथील शासन आदेशान्वये शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.२२.०४.२०२५ (वाचा क्र.२) मधील तरतुदीन्वये श्री.शंभूराजे वाबळे, उप अधिक्षक भूमि अभिलेख यांची पुन:स्थापनेनंतर पुढील तक्त्यातील रकाना क्र.३ येथील नमूद पदावर पदस्थापना करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	पदस्थापनेचे पद/ठिकाण	शेरा
१	*२*	*३*	*४*
१	श्री.शंभूराजे वाबळे, उप अधिक्षक भूमि अभिलेख	उप जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे	रिक्त पदी

४. श्री.वाबळे यांनी पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे तसेच त्यांना रुजू होण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी व त्यांचा पदस्थापनेच्या पदावरील रुजू अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०८१२१८३१५३२३४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=F0B627B3230194FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E89366B, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2026.08.12 18:32:46 +05'30'

(अश्विनी यमगर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

१. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.रा.), पुणे.
२. श्री.शंभूराजे वाबळे, उप अधिक्षक भूमि अभिलेख.
(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.रा.), पुणे यांच्यामार्फत)

प्रत:-

१) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
२) अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
६) कार्यासन आस्था-६ संग्रहार्थ.